नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ रे | Year - 4rd | अंक - ७३ | Issue - 73 | वार - गुरुवार दि. ६ ऑगस्ट २०२६ | Blow- Thursday Date 6 AUGUST 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## मुसळधार पाऊस; देशातील १७ राज्यांना हाय अलर्टचा इशारा

### मुसळधार पाऊस थांबायचं नाव घेईना! ; आसाममधील पूरस्थिती गंभीर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : देशातील अनेक राज्यांमध्ये पावसाचा जोर कायम असून काही भागांमध्ये पूरस्थिती निर्माण झाली आहे. विशेषतः आसाम आणि नागालँडमध्ये मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. आसाममध्ये पुरामुळे आतापर्यंत ९५ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. दरम्यान, राजधानी दिल्लीसह उत्तर भारतातील अनेक भागांमध्ये गेल्या तीन दिवसांपासून सातत्याने पाऊस सुरू आहे. भारतीय हवामान विभागाने देशातील १७ राज्यांमध्ये मुसळधार पाऊस, तसेच ताशी ५० ते ७० किलोमीटर वेगाने वारे वाहण्याची शक्यता व्यक्त केली आहे.



हवामान विभागाच्या अंदाजानुसार, उत्तर प्रदेश, उत्तराखंड, बिहार आणि इतर काही राज्यांमध्ये नागरिकांनी विशेष खबरदारी घ्यावी. जोरदार वाऱ्यामुळे झाडे कोसळण्याचा धोका असून सखल भागांमध्ये पाणी साचण्याची आणि पूरस्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे. पश्चिम मध्य प्रदेशातील काही भागांमध्ये ६ आणि ८ ऑगस्ट रोजी अतिवृष्टीचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. तसेच छत्तीसगड, पूर्व मध्य प्रदेश आणि पश्चिम मध्य प्रदेशातील काही भागांतही पुढील काही दिवस मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. केरळ आणि कर्नाटकमध्येही पुढील तीन दिवस पावसाचा जोर कायम राहण्याचा अंदाज आहे.

दिल्ली-एनसीआरमध्येही पावसाची संततधार सुरूच आहे. बुधवारी सुमारे दोन तास जोरदार पाऊस झाल्यानंतर गुरुवारी सकाळपासून पुन्हा पावसाने हजेरी लावली. हवामान विभागाने ५ ते ८ ऑगस्टदरम्यान हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाचा अंदाज व्यक्त केला आहे. मात्र, सध्या दिल्लीसाठी कोणताही विशेष सतर्कतेचा इशारा जारी करण्यात आलेला नाही. उत्तराखंड, कोकण आणि गोव्यात मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. हरियाणा, चंदीगड, राजस्थान, मध्य प्रदेश, छत्तीसगड, पश्चिम बंगाल, सिक्कीम, अरुणाचल प्रदेश, नागालँड, मणिपूर, मिझोराम, त्रिपुरा, तामिळनाडू, पुद्दुचेरी, केरळ आणि माहे येथेही जोरदार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. महाराष्ट्र, हिमाचल प्रदेश, जम्मू-काश्मीर, लडाख, ओडिशा, झारखंड, आसाम, मेघालय, कर्नाटक आणि लक्षद्वीपमध्ये हलका ते मध्यम पाऊस पडण्याचा अंदाज आहे.

उत्तर प्रदेशातही पावसाचा प्रभाव कायम आहे. राज्यातील ५ जिल्ह्यांसाठी ऑरेंज अलर्ट, तर पश्चिम उत्तर प्रदेशातील २० जिल्ह्यांसाठी यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. हवामान विभागाने नागरिकांना सतर्क राहण्याचे आणि आवश्यक असल्यास सुरक्षित ठिकाणी जाण्याचे आवाहन केले आहे.

## राज्यात अनलॉग पनीरवर बंदी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



### तुकाराम मुंढे यांचा सर्वात मोठा दणका

मुंबई : अन्न आणि औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी मोठा निर्णय घेतला आहे. तुकाराम मुंढे यांनी राज्यात अनलॉग पनीरवर पुढच्या वर्षभरासाठी बंदी घातली आहे. अनलॉग पनीर हे दुग्धजन्य पदार्थ नाही. ते वनस्पती किंवा पामतेलचा वापर करुन तयार करण्यात आलं असतं. पण पनीर समजून ते नागरिकांना खायला दिलं जाऊ शकतं. पनीर की अनलॉग पनीर हे सर्वसामान्य नागरीक बऱ्याचदा ओळखू शकत नाहीत. तसेच ते आरोग्यासाठी घातक आहे. त्यामुळे अनलॉग पनीरवर बंदी घालण्यात आली असल्याचं तुकाराम मुंढे यांनी स्पष्ट केलं आहे.

आपण अन्न सुरक्षेसाठी मिशन ठरवलेलं आहे. त्या अनुषंगाने आपण वेगवेगळ्या सेक्टरमध्ये कारवाई करत आहोत. सेफ फूड, सेफ ड्रग, सेफ महाराष्ट्र या मोहीमेचा पुढच्या टप्प्यावर आता काम केलं आहे. कायद्यानुसार, प्रत्येक राज्याला एक फूड सेफ्टी कमिश्नर असतो. सेक्शन ३० अंतर्गत फूड सेफ्टी कमिश्नरला काही अधिकार दिलेले आहेत. काही अन्नपदार्थांवर काही काळासाठी बंदी आणायची असेल तर ते अधिकार कायद्याने फूट सेफ्टी कमिश्नरला दिलेले आहेत. कलम ३ मधील २ भाागामध्ये नुसार हे अधिकार दिलेले आहेत, असं तुकाराम मुंढे म्हणाले. महाराष्ट्रात आणि इतर राज्यात पनीरच्याबाबत अनेक इशू आहेत. यामध्ये अनलॉग पनीर किंवा नॉन डेअरी पनीर असे पदार्थ मार्केटमध्ये तयार केले जातात. त्यामध्ये चुकीच्या पद्धतीने पनीर मार्केटमध्ये विकलं जातं. त्याचे परिणाम सर्वसामान्य नागरिकांच्या आरोग्यावर झालेले आहेत, असं तुकाराम मुंढे यांनी सांगितलं. कायद्याने दिलेल्या अधिकाऱ्यानुसार महाराष्ट्रात ३० जुलै २०२६ रोजी नोटीफिकेशन काढून अनलॉग पनीर किंवा नॉन डेअरी पनीर याच्या उत्पादन प्रक्रिया, साठवणूक, वाहतूक, वितरण आणि विक्रीवर एक वर्षासाठी बंदी घातली आहे. एक वर्षानंतर रिव्ह्यू केला जाईल आणि पुन्हा बंदी ठेवायची का याबाबत निर्णय घेतला जाईल, अशी घोषणा तुकाराम मुंढे यांनी केली. अनलॉग पनीरबाबत वारंवार चर्चा झाली आहे. वेगवेगळ्या प्लॅटफॉर्मवर याबाबत चर्चा झाली आहे. त्याअनुषंगाने गेल्या वर्षभरात मार्केटमधून काही सॅम्पल्स घेतले होते. एकूण ३०८ नमुने टेस्ट केले. त्यापैकी १०९ नमुने हे नियमबाह्य आढळले. त्यापैकी अनेक असुरक्षित आढळले. त्याचा परिणाम आरोग्यावर होतो, असं तुकाराम मुंढे म्हणाले. हॉटेल्स, रेस्टॉरंट, कॅटर्स, किचन्स आणि इतर खाद्य पुरवणाऱ्या संस्था आहेत यांच्या माध्यमातून पनीरचा पूर्ण वापर आपण प्रतिबंधित केलेला आहे. जेणेकरुन कशाही पद्धतीत त्यांना साठवणूक किंवा विक्री करता येणार नाही, असं तुकाराम मुंढे यांनी स्पष्ट केलं.

## मेटाला पीएम मोदींचा व्हिडिओ हटवणे भोवले; झुकरबर्ग यांनी मागितली माफी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : नीट परीक्षा पेपर लीक प्रकरणी दिल्लीतील जंतरमंतर येथे देशभरातून आंदोलनाचा भडका उडाला होता. या गंभीर पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तरुणांशी संवाद साधत दोषींवर कडक कारवाई करण्याचे स्पष्ट आश्वासन देणारा एक व्हिडिओ पोस्ट केला होता. इन्स्टाग्रामवर या व्हिडिओने अवघ्या २४ तासांत सर्वाधिक व्ह्यूजचा विक्रम प्रस्थापित केला. मात्र, अचानक फेसबुकने हा महत्त्वाचा व्हिडिओ प्लॅटफॉर्मवरून हटवल्यामुळे तीव्र संताप व्यक्त केला गेला. वाद चिघळल्यानंतर स्पष्टीकरण देताना मेटाच्या प्रवक्त्याने तांत्रिक चुकीमुळे व्हिडिओ हटवला गेल्याचे मान्य केले आणि तो पुन्हा पूर्ववत केला. या संपूर्ण वादानंतर केंद्र सरकारने मेटाच्या अधिकाऱ्यांना तातडीने समन्स बजावले. बुधवारी मेटाच्या जागतिक प्रतिनिधींच्या टीमने माहिती व तंत्रज्ञान मंत्रालयाच्या उच्च अधिकाऱ्यांची भेट घेतली. या बैठकीत केवळ पंतप्रधान मोदींच्या व्हिडिओवरील चुकीची कारवाईच नाही, तर प्लॅटफॉर्मवर वाढणारे बाल लैंगिक शोषणाचे कंटेंट, महिलांविरोधातील छळवणूक, डीपफेक आणि नियमांचे उल्लंघन यांसारख्या गंभीर मुद्द्यांवर सरकारकडून कडक शब्दांत जाब विचारण्यात आला. पंतप्रधान मोदींचा व्हिडिओ हटवल्याच्या घटनेची संसदीय स्थायी समितीने अत्यंत गंभीर दखल घेतली. समितीने थेट मेटाचे प्रमुख मार्क झुकरबर्ग यांना अधिकृत माफी मागण्यासाठी ३ दिवसांची अंतिम मुदत दिली होती. याचसोबत, बाल लैंगिक शोषण किंवा महिलांचा अवमान करणारा मजकूर दाखवणाऱ्या अशा डिजिटल प्लॅटफॉर्म्सवर कठोर कायदेशीर कारवाई करण्याची आक्रमक भूमिका समितीने घेतली. अखेर वाढता दबाव लक्षात घेता झुकरबर्ग यांनी प्लॅटफॉर्मवरील गंभीर चुका, डीपफेक आणि उडच् कंटेंटच्या मुद्द्यावर जाहीर माफी मागितली. या संपूर्ण प्रकरणात केंद्र सरकारने मेटाला अत्यंत कडक शब्दांत धक्का दिला आहे. आयटी कायद्यांतर्गत सोशल मीडिया कंपन्यांना 'मध्यस्थ' म्हणून मिळणारे कायदेशीर सुरक्षेचे कवच मेटाला आता लागू होणार नाही, असे सरकारने स्पष्ट केले.

## 'ज्ञानयुगाचा दीप' मालवला; पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांना कोल्हापूरचा अश्रुपूर्ण अखेरचा निरोप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कोल्हापूर : शिक्षण, समाजसेवा आणि आरोग्य क्षेत्रात अमिट ठसा उमटवणारे ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ, माजी राज्यपाल आणि पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांच्यावर बुधवारी सायंकाळी कोल्हापूरातील कसबा बावडा येथील पॅव्हेलियन मैदानावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. वयाच्या ९१ व्या वर्षी त्यांचे निधन झाल्यानंतर संपूर्ण कोल्हापूरसह राज्यभरातून शोक व्यक्त करण्यात आला. त्यांच्या पार्थिवाला तिरंगा झेंड्यात लपेटून पोलीस दलाने बंदुकींच्या फैरी झाडत मानवंदना दिली. पद्मश्री डॉक्टर डी वाय पाटील यांच्या निधनानंतर अंतिम दर्शनासाठी त्यांचे पार्थिव कसबा बावडा येथील 'यशवंत निवास' येथे ठेवण्यात आले होते. दिवसभर हजारो नागरिक, विद्यार्थी, माजी विद्यार्थी, सामाजिक कार्यकर्ते आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांनी रांगा लावत आपल्या लाडक्या 'दादा'ना अखेरचा निरोप दिला.



सायंकाळी कुटुंबाकडून धार्मिक विधी पार पडल्यानंतर दुपारी ४ वाजता सुरू झालेली अंत्ययात्रा मेडिकल कॉलेज, लाईन बाजार, भगवा चौक आणि कसबा बावड्यातील प्रमुख मार्गांवरून पॅव्हेलियन मैदानामध्ये पोहोचली. या संपूर्ण मार्गावर नागरिकांनी पुष्पवृष्टी करत डी. वाय. दादा अमर रहे अशा घोषणांनी वातावरण भारावून टाकले.

डॉक्टर डी वाय पाटील यांच्या पार्थिवाच्या अंत्यदर्शनासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्यासह विविध पक्षांचे वरिष्ठ नेते, मंत्री, खासदार, आमदार तसेच शैक्षणिक कला, क्रीडा आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

डॉ. डी. वाय पाटील यांची अंत्ययात्रा अंत्यविधीस्थळी पोहोचल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वतीने उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी पुष्पचक्र अर्पण केले. तसेच सुशीलकुमार शिंदे, हसन मुश्रीफ, प्रकाश आबिटकर, शाहू छत्रपती, जयंत पाटील, बाळासाहेब थोरात, अंबादास दानवे, राजू शेट्टी, संभाजीराजे छत्रपती, विश्वजित कदम, अमित देशमुख, यशोमती ठाकूर यांच्यासह अनेक मान्यवरांनी पुष्पचक्र अर्पण करत श्रद्धांजली वाहिली. अंत्यसंस्कारावेळी डी. वाय. पी. समूहाचे अध्यक्ष डॉ. संजय डी. पाटील यांनी पार्थिवाला मुखाग्नी दिला. त्या क्षणी उपस्थित हजारो नागरिकांच्या डोळ्यांत अश्रू दाटून आले. पाटील कुटुंबीयांसह आमदार सतेज पाटील, विजय पाटील, अजिंक्य पाटील आणि ऋतुराज पाटील आणि सर्व कुटुंबीय उपस्थित होते.

### मोदी सरकारची मोठी कारवाई!

### 'ऑपरेशन त्रिशूल'ने वाढवली तपास यंत्रणांची ताकद

## ७ वर्षांत ३६ देशांतून २७४ फरार गुन्हेगार भारतात परत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : देशातून पळून गेलेल्या फरार गुन्हेगारांविरोधात केंद्र सरकारने मोठी मोहीम हाती घेतली असून, २०१९ ते २०२६ या कालावधीत ३६ देशांतून २७४ फरार गुन्हेगारांना भारतात परत आणण्यात यश आले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या मार्गदर्शनाखाली प्रत्यार्पण प्रक्रियेला राष्ट्रीय प्राधान्य देण्यात आल्याची माहिती केंद्र सरकारकडून देण्यात आली आहे.

केंद्र सरकारच्या म्हणण्यानुसार, यापूर्वी फरार गुन्हेगारांना देशात परत आणण्यासाठी आवश्यक राजकीय इच्छाशक्तीचा अभाव होता. मात्र, मोदी सरकारने या विषयाला राष्ट्रीय सुरक्षेशी जोडत जागतिक पातळीवर समन्वय, मजबूत कायदेशीर व्यवस्था आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून कारवाईला वेग दिला आहे.

**फरार गुन्हेगारांविरोधात तीन स्तंभांवर आधारित रणनीती :**

केंद्र सरकारने फरार गुन्हेगारांना पकडण्यासाठी तीन प्रमुख आधारांवर धोरण आखले आहे. जागतिक स्तरावरील समन्वय, तपास यंत्रणांमधील सशक्त सहकार्य आणि प्रभावी राजनैतिक प्रयत्न. फरार गुन्हेगारांची समस्या ही केवळ कायदा-सुव्यवस्थेपुरती मर्यादित नसून देशाचे सार्वभौमत्व, आर्थिक स्थैर्य आणि राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित असल्याचे सरकारने स्पष्ट केले आहे.

**इंटरपोलच्या माध्यमातून कारवाईला वेग :**

मोदी सरकारच्या काळात इंटरपोलच्या माध्यमातून फरार आरोपींवर कारवाईचा वेग वाढला आहे. गेल्या तीन वर्षांत ४०१ फरार गुन्हेगारांविरोधात रेड कॉर्नर नोटीस जारी करण्यात आल्याची माहिती देण्यात आली आहे. तसेच, भारताने 'भारतपोल' ही सुविधा सुरू करून देशातील १,४०० हून अधिक तपास संस्थांना इंटरपोलशी जोडले आहे. यामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावरील माहितीची देवाणघेवाण अधिक वेगाने होत असून, माहिती मिळवण्याचा कालावधी ३ ते १० दिवसांपर्यंत कमी झाल्याचे सांगण्यात आले आहे.

**कायदेशीर व्यवस्थेतही मोठे बदल :** फरार गुन्हेगारांविरोधातील कारवाई अधिक प्रभावी करण्यासाठी केंद्र सरकारने २०१९ मध्ये राष्ट्रीय तपास संस्था सुधारणा कायदा आणि बेकायदेशीर कृत्ये प्रतिबंधक सुधारणा कायदा लागू केला. तसेच, नव्या तीन फौजदारी कायद्यांमध्ये फरार आरोपींशी संबंधित विशेष तरतुदी करण्यात आल्या आहेत. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता मधील कलम ३५५ आणि ३५६ अंतर्गत प्रथमच आरोपीच्या अनुपस्थितीत खटल्याची प्रक्रिया पुढे नेण्याची तरतूद करण्यात आली आहे.

**आर्थिक गुन्हेगारांवरही कठोर कारवाई :** आर्थिक गैरव्यवहार प्रतिबंधक कायदा अंतर्गत केंद्र सरकारने मोठी कारवाई केली आहे. २०१९ ते २०२६ या कालावधीत फरार आर्थिक गुन्हेगारांच्या १७,८७४ कोटी रुपयांच्या मालमत्ता जप्त करण्यात आल्याची माहिती देण्यात आली आहे. याशिवाय, देशाबाहेर पळून गेलेल्या आर्थिक गुन्हेगारांकडून निधी वसूल करून या कालावधीत एकूण १८,७६२ कोटी रुपये परत मिळवण्यात आल्याचे सरकारने सांगितले आहे.

**'ऑपरेशन त्रिशूल'मुळे शोध मोहिमेला बळ :** नावे आणि ओळख बदलून परदेशात लपलेल्या फरार गुन्हेगारांचा शोध घेण्यासाठी केंद्र सरकारने 'ऑपरेशन त्रिशूल' अंतर्गत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला आहे. या मोहिमेत उपग्रह तंत्रज्ञान, डिजिटल पदचिन्हे आणि गुप्तचर माहितीच्या आधारे फरार आरोपींचा शोध घेण्यावर भर देण्यात आला आहे. केंद्र सरकारच्या म्हणण्यानुसार, फरार गुन्हेगारांविरोधातील ही मोहीम पुढेही अधिक वेगाने सुरू राहणार असून, देशाबाहेर लपलेल्या आरोपींना कायद्याच्या कक्षेत आणण्यासाठी आंतरराष्ट्रीय सहकार्य आणखी मजबूत केले जाणार आहे.

# राज्यात एक हजार रोजगार मेळाव्यांचे आयोजन - कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा

## तरुण आणि सामाजिक संस्थांशी संपर्क साधून रोजगार मेळाव्याच्या संपूर्ण कार्यक्रमाची व्यापक प्रसिद्धी करावी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यात युवक-युवतींना रोजगाराच्या जास्तीत जास्त संधी उपलब्ध करून देण्यासाठी कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या वतीने १ एप्रिल २०२६ ते ३१ मार्च २०२७ दरम्यान एक हजार रोजगार मेळाव्यांचे आयोजन केले जाणार आहे. या रोजगार मेळाव्यांची व्यापक माहिती गरजू तरुणांपर्यंत पोहोचण्यासाठी समाजातील सर्व घटकांना सोबत घेऊन काम करणे गरजेचे असल्याचे मत कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी व्यक्त केले.

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात राज्यस्तरीय रोजगार मेळावा समितीची बैठक पार पडली. या बैठकीत राज्यस्तरीय रोजगार मेळाव्याचे अध्यक्ष डॉ. रणजित पाटील, सदस्य डॉ. सरोजिनी राऊत, रविंद्र देशपांडे, विशाल टिब्रेवाल, जयेश ढाके, राहुल खोले, सदस्य सचिव तथा कौशल्य विकास,रोजगार व उद्योजकता आयुक्तालयाचे आयुक्त डॉ.अमित सैनींसह शासकीय सदस्य उपस्थित होते.

मंत्री लोढा म्हणाले की, आयटीआय व्यतिरिक्त इतर कॉलेजमधील विद्यार्थी, अपस्किलिंगची गरज असणारे तरुण आणि सामाजिक संस्थांशी संपर्क साधून रोजगार मेळाव्याच्या संपूर्ण कार्यक्रमाची व्यापक प्रसिद्धी करावी. तसेच राज्यातील प्रत्येक जिल्हयात व तालुक्यात याची माहिती दिली जाईल. तरुणांना रोजगाराचे महत्व आणि स्वरोजगाराचे फायदे पटवून देण्यासाठी तज्ज्ञ व्यक्ती व एनजीओंच्या माध्यमातून समुपदेशन केले जाईल. पहिल्या आठवड्यात पर्सनॅलिटी डेव्हलपमेंट, एटीकेट (शिष्टाचार), बायोडाटा तयार करणे आणि संभाषण कौशल्यांवर भर दिला जाईल. दुसऱ्या आठवड्यामध्ये विद्यार्थ्यांच्या ॲप्टिट्यूड टेस्टनुसार इलेक्ट्रिसिटी, प्लंबिंग, रिसेप्शनिस्ट आणि मार्केटिंग यांसारख्या क्षेत्रांत थेट प्रात्यक्षिक दिले जाईल, असे त्यांनी सांगितले.

मंत्री लोढा म्हणाले की, केवळ रोजगार मेळावे आयोजित न करता उमेदवारांना पूर्व-प्रशिक्षण देणे अत्यंत आवश्यक आहे. रोजगार मेळाव्यापूर्वी उमेदवारांना दोन आठवड्यांचे कौशल्य व पूर्व-रोजगार प्रशिक्षण दिले जावे. उमेदवारांना योग्य मार्गदर्शन व प्रशिक्षण मिळाल्यास मेळाव्यांमधील निवडीचे प्रमाण लक्षणीयरित्या वाढेल. या उपक्रमाच्या नियोजनासाठी आणि अंमलबजावणीसाठी संबंधित विभागाचे अधिकारी व प्रदेश समन्वय समिती यांनी एकत्रितपणे काम करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. समन्वय समिती व विभागीय अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक घेऊन मेळावे यशस्वी करूया. समाजातील सर्व घटकांचा सहभाग वाढवून रोजगार निर्मितीची प्रक्रिया अधिक व्यापक आणि परिणामकारक बनवण्यावर भर देण्यात यावा. समितीतील सर्व सदस्यांनी या मोहिमेत सक्रीय सहभागी होऊन युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देऊया.



कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालयाचे आयुक्त डॉ. अमित सैनी यांनी रोजगार मेळाव्यांच्या केलेल्या नियोजनसंदर्भात बैठकीत माहिती दिली. समितीच्या सदस्यांनी रोजगार मेळाव्यासंदर्भात सूचना केल्या.

# येडोळा पाटी ते येडोळा गावाला जोडणाऱ्या रस्त्याचे डांबरीकरण करावे व बोरी नदीवर पुलाचे बांधकाम करावे आदीसह विविध मागण्यांचे रिपाइं (आठवले) शाखेच्या वतीने जनता दरबारात दिले निवेदन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस.के.गायकवाड : तुळजापूर तालुक्यातील दुर्गमय डोंगर माळरानात वसलेल्या येडोळा गाव ते नळदुर्ग-अक्कलकोट रोड वरील येडोळा पाटी जोडणाऱ्या रस्त्याचे डांबरीकरण करावे व बोरी नदीवर कायम स्वरूपी पुलाचे बांधकाम करून हा रस्ता दळण वळणासाठी सुरळीत करावा या प्रमुख मागणी सह अन्य विविध मागण्याचे निवेदन रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) शाखा येडोळ्याच्या वतीने येथे आयोजित जनता दरबार व आढवा बैठकीत देण्यात आले आहे. दि.४ऑगस्ट २०२६ रोजी प्रशासनाचा गावगाडा लोकांच्या दारी या उपक्रमा अंतर्गत ग्राम पंचायत येडोळा गावातील नागरिकांचा जनता दरबार व आढावा बैठक घेण्यात आली.या जनता दरबारास पंचायत समिती तुळजापूरचे सभापती व उपसभापती यांची अनुउपस्थितती दिसून आली तर जि.प. चे अर्थ व बांधकाम सभापती सिद्धेश्वर आण्णा कोरे, उपसभापती पती विवेकानंद मिलगीरे,प.स.सदस्य भिवाजी इंगोले, ग्रा.प.येडोळा सरपंचाचे प्रतिनिधी,शिवाजी जाधव,विस्ताराधिकारी जिवन पांचाळ,कृषी अधिकारी शुभम चव्हाण,कृषी सहाय्यक योगेश क्षिरसागर,कृषी समुह सहाय्यक गुलनाज शेख, डॉक्टर शेख आदींची मात्र प्रमुख उपस्थिती होती. जि. प. धाराशिवचे कृषी व बांधकाम सभापती सिध्देश्वर कोरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या जनता दरबार व आढावा बैठकीत येथिल जि.प. प्राथमिक शाळेत पाणी पुरवठा करणे, गायरान तांडा येथील अंगणवाडीत किचन शेडची व्यवस्था करणे, गावातील अंतर्गत रस्ते दुरूस्त करणे आदी सह गावच्या आडीआडणी संदर्भात चर्चा करण्यात आली. या प्रसंगी रिपाइं (आठवले) शाखा येडोळा च्या वातीने देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की नळदुर्ग - अक्कलकोट रोड वरिल येडोळा पाटी ते येडोळ गाव जोडणाऱ्या रस्त्याचे डांबरीकरण करावे,बोरी नदीवर कायम स्वरूपी पुलाचे बांधकाम करून येडोळा पाटी ते येडोळा गाव रस्ता दळण वळणासाठी सुरळीत करावा, जाणूजीराजे भोसले ऐतिहासिक समाधी पासून ते भिम नगर या मुख्या रस्त्याचे अंतर्गत सिमेंट रस्ता करावा, लोंढे नगर, भिम नगर येते अंतर्गत गटारीये बांधकाम करावे, भिमनगर येथे ओपन जिम ची सोय करावी आदी सह अन्य मागण्याने निवेदन अर्थ व बांधकाम सभापती सिध्देश्वर आण्णा कोरे याना देण्यात आले.यावेळी. रिपाइंचे (आठवले) शाखा अध्यक्ष देवानंद लोंढे, रामचंद्र लोंढे, भानुदास लोढे, अमर जेटीथोर, अमित लोंदे, शितल लोंढे, माजी सरपंच प्रभाकर पाटील, दिगंबर पाटील, बंटी पाटील, नवनाथ जाधव सह ग्रामस्थ उपस्थित होते.

# सोलापूर जिल्हा परिषदेचे शिवरत्न सभागृहाचे नाव हटवले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : सोलापूर जिल्हा परिषदेचे शिवरत्न सभागृह भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी सभागृह नामकरण ठराव झेडपी करणार ११ तालुक्यात ११ आदर्श शाळा.

जिल्हा परिषद सोलापूरच्या स्थायी समितीची बैठक अध्यक्ष तथा सभापती दीपक वैद्य यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा परिषदेच्या शिवरत्न सभागृहात झाली, जिल्ह्याच्या विकास कामांना गती देतानाच गुणवत्ता, पारदर्शकता, आणि



नागरिकांना प्रभावी सेवा मिळणार बैठकीत भर देण्यात आला.

शिक्षण विभागाच्या आढाव्यात ११ तालुक्यात ११००० ची शाळा उभारण्याचा निर्धार करण्यात आला. प्रत्येक तालुक्यात विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणासोबत आधुनिक सुविधा गुणवत्ता पूर्ण शैक्षणिक वातावरण आणि आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी नियोजनबद्ध कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

आरोग्य विभागाच्या चर्चेत सर्पदंश व रेबीज प्रतिबंधक उपाय योजना तसेच आरोग्य संस्थांमध्ये आधुनिक सुरक्षित साठा करण्यासाठी आवश्यक जागेची उपलब्धता या विषयावर चर्चा झाली व ग्रामीण भागातील नागरिकांना अपत्कालीन परिस्थिती तातडीने उपचार मिळवण्यासाठी आवश्यक नियोजन करण्यावर भर देण्यात आला.

जिल्हा परिषदेच्या शिवरत्न सभागृहाला अटल बिहारी वाजपेयी सभागृह असे नामकरण करण्याचा महत्त्वपूर्ण ठराव उपाध्यक्ष इंग्रजीत पवार यांनी सादर केला.

# श्री माणकेश्वर वाचनालयाच्या चिटणीसपदी सुनील चिखले संचालकपदी विजय धारराव यांची निवड





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड येथील श्री माणकेश्वर वाचनालयाच्या चिटणीस पदी सुनील कारभारी चिखले यांची तर संचालक पदी . विजय देविदास धारराव यांची निवड करण्यात आली.

श्री माणकेश्वर वाचनालयाच्या संचालक मंडळाची मासिक सभा वाचनालयाचे अध्यक्ष मधुकर बाबुराव शेलार यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली यात चिटणीस पदासाठी सुनील चिखले व संचालक पदासाठी विजय धारराव यांच्या नावाची सूचना मधुकर शेलार यांनी मांडली त्यास तनवीर राजे व सुहास सुरळीकर यांनी अनुमोदन दिले.

यावेळी अध्यक्ष मधुकर शेलार यांनी आपल्यावर विश्वास टाकून आम्हाला सर्व संचालक मंडळाने सहकार्य केले त्याबद्दल आभार मानून यापुढेही सर्व संचालकांनी नवीन पदाधिकाऱ्यांना सहकार्य करून वाचनालयाच्या विकासात भर घालावी असे आवाहन केले व. पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले.

सभेत वाचनालय उपाध्यक्षा डॉ.मेघा बाळासाहेब जंगम, जेष्ठ संचालक दत्त काका उगावकर, तन्वीर राजे, सुहास सुरळीकर, ग्रंथमित्र नईमखान पठाण, .राजू खालकर, बाळासाहेब कर्डिले डॉ. महेश बनकर, संचालिका सौ.सुजाता तनपुरे, स्वीकृत संचालक गुलाब टकले, .शामराव गोळे ग्रंथपाल नितीन बनसोडे, सहाय्यक ग्रंथपाल सौ.आरती जंगम सौ.अनिता इस्ते श्री.नंदकुमार पुंड आदी उपस्थित होते.

## श्रीवर्धन तालुक्यातील पाणीटंचाईग्रस्त गावांचा आढावा

# जुने पाण्याचे स्रोत पुनर्जीवित करून टंचाई आराखड्यात समावेश करा : मंत्री आदिती तटकरे



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : श्रीवर्धन तालुक्यातील प्रत्येक गावासाठी स्वतंत्र सूक्ष्म नियोजन करावे. तसेच संबंधित गावातील पाण्याचा स्रोत, नाले, बंधारे, साठवण तलाव आणि इतर जलस्रोतांचा अभ्यास करून भविष्यात पाणीटंचाई निर्माण होणार नाही, यासाठी नियोजन करण्याच्या सूचना महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिल्या.

श्रीवर्धन तालुक्यातील पाणीटंचाईग्रस्त गावांच्या परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी मंत्रालयात महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली. यावेळी रायगड जिल्हाअधिकारी किशन जावळे दूरदृश्यप्रणालीद्वारे उपस्थित होते. उपविभागीय दंडाधिकारी, तहसीलदार, प्रांत अधिकारी, कार्यकारी अभियंता यावेळी उपस्थित होते. यावेळी टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू असलेल्या गावांचा, जलजीवन मिशनच्या कामांच्या प्रगतीचा तसेच भविष्यातील दीर्घकालीन उपाययोजनांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, रायगड जिल्ह्यातील गावांना भविष्यात पाणीटंचाईचा सामना करावा लागू नये, यासाठी उपलब्ध जलस्रोत निश्चित करणे, बंधारे व साठवण तलावांची दुरुस्ती, गाळ काढणे, जलस्रोतांचे पुनरुज्जीवन आदी कामे हाती घ्यावीत, जेणेकरून पावसाच्या पाण्याची योग्य साठवण होईल. जलजीवन मिशन योजनांच्या परिसरातील टंचाईग्रस्त गावांची निश्चिती करून पाणीटंचाईची कारणे, उपलब्ध साधनसामग्री, आवश्यक उपाययोजना आणि त्यासंदर्भातील सर्व माहिती संकलित करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

कृषी विभाग, वन विभाग आणि जलसंवर्धन विभाग यांच्या समन्वयातून ही कामे हाती घेण्यासाठी आवश्यक प्रस्ताव तातडीने सादर करावेत. श्रीवर्धन तालुक्यात सध्या २८ गावे आणि ३६ वाड्या पाणीटंचाईच्या समस्येने प्रभावित असून, प्रत्येक गावासाठी स्वतंत्र सूक्ष्म नियोजन करून दीर्घकालीन उपाययोजना राबविण्याचे निर्देश मंत्री आदिती तटकरे यांनी यावेळी दिले.

टँकर सुरू असलेल्या प्रत्येक गावाची स्वतंत्र माहिती तयार करून त्या गावांमधील जलजीवन मिशन योजनांच्या प्रगतीचा यावेळी आढावा घेण्यात आला. शासनाच्या नव्या निर्देशानुसार २५ टक्क्यांपेक्षा कमी प्रगती झालेल्या जलजीवन मिशन योजनांना प्राधान्य देऊन त्यांचे नियोजन करावे, तसेच आवश्यक त्या ठिकाणी तातडीने कार्यवाही करावी, असे निर्देश मंत्री आदिती तटकरे यांनी दिले.

# 'नशामुक्त युवा - विकसित भारत संकल्प अभियान' अंतर्गत निफाड नगरपंचायत येथे नियोजन बैठक व व्यसनमुक्ती शपथ उत्साहात संपन्न



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड नगरपंचायत येथे नशामुक्त युवा- विकसित भारतसंकल्प अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी निफाड शहरातील सर्व शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक, मा. पोलीस निरीक्षक, निफाड नगरपंचायतीचे उपनगराध्यक्ष, मुख्याधिकारी तसेच अधिकारी व कर्मचारी यांच्या उपस्थितीत नियोजन बैठक उत्साहात संपन्न झाली. बैठकीमध्ये अभियानाची उद्दिष्टे, नशामुक्तीबाबत जनजागृती, विद्यार्थ्यांचा व नागरिकांचा सहभाग, विविध उपक्रमांचे नियोजन तसेच शाळा, पोलीस प्रशासन आणि नगरपंचायत यांच्या समन्वयातून अभियान प्रभावीपणे राबविण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.यावेळी उपस्थित मान्यवरांनी नशामुक्त भारताच्या संकल्पनेला बळकटी देण्यासाठी सर्वांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन केले. अभियानांतर्गत जनजागृती रॅली, शपथविधी, व्याख्याने, स्पर्धा, स्वच्छता अभियान, वृक्षारोपण तसेच नशामुक्तीविषयक विविध कार्यक्रम आयोजित करण्याचे नियोजन करण्यात आले. बैठकीस सर्व संबंधित अधिकारी, कर्मचारी, मुख्याध्यापक व शिक्षक यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून अभियान यशस्वी करण्याचा निर्धार व्यक्त केला.

निफाड नगरपंचायत कार्यालयात, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा निफाड क्रमांक १ , सरस्वती विद्यालय, निफाड इंग्लिश स्कुल या शाळेत व्यसनमुक्ती शपथ कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. निफाड नगरपंचायतीचे अधिकारी, कर्मचारी व उपस्थित नागरिकांनी व्यसनमुक्त समाज घडविण्याचा निर्धार व्यक्त केला. युवकांना व्यसनापासून दूर ठेवून निरोगी, सशक्त आणि विकसित भारताच्या निर्मितीसाठी सर्वांनी सक्रिय सहभाग नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले. या उपक्रमातून व्यसनमुक्तीचा संदेश समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्याचा संकल्प करण्यात आला.

तसेच विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी व्यसनमुक्त समाज घडविण्याचा संकल्प करत व्यसनापासून दूर राहण्याची सामूहिक शपथ घेतली. विद्यार्थ्यांना तंबाखू, गुटखा, मद्य व इतर अमली पदार्थांच्या सेवनामुळे होणारे शारीरिक, मानसिक आणि सामाजिक दुष्परिणाम याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. तसेच, निरोगी जीवनशैलीचा स्वीकार करून स्वतः व्यसनमुक्त राहण्याबरोबरच कुटुंब आणि समाजातही व्यसनमुक्तीचा संदेश पोहोचविण्याचे आवाहन करण्यात आले.निफाड नगरपंचायतीतर्फे राबविण्यात येत असलेल्या या अभियानाला शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी आणि उपस्थितांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. विकसित भारताच्या निर्मितीसाठी व्यसनमुक्त युवकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले.



# मौलाना आझाद पॉलिटेक्निकमध्ये नवोदित विद्यार्थ्यांचा भव्य स्वागत समारंभ व गुणवंतांचा गुणगौरव सोहळा उत्साहात

## उत्कृष्ट निकाल देणाऱ्या प्राध्यापकांचा गुणगौरव सोहळा पार पडला; मान्यवरांची होती उपस्थिती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : द ग्रेट मौलाना अबुल कलाम अझाद अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था संचलित मौलाना आझाद पॉलिटेक्निक, सोलापूर येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील प्रथम वर्ष तसेच थेट द्वितीय वर्ष (Direct Second Year) प्रवेशित विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ आणि उन्हाळी परीक्षा २०२६ मध्ये उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा तसेच उत्कृष्ट निकाल देणाऱ्या प्राध्यापकांचा गुणगौरव सोहळा अत्यंत उत्साहपूर्ण आणि दिमाखदार वातावरणात संपन्न झाला.




कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. अमिरोद्दीन हुसेनसाब शेख हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाचे राज्य सदस्य (वैधानिक दर्जा) मा. वसीम खाजाभाई बुऱ्हाण, महावितरण, सोलापूरचे कार्यकारी अभियंता मा. श्री. विनायक पं. इदाते तसेच प्रख्यात कन्सल्टंट फिजिशियन मा. डॉ. इस्माईल शेख (एम.डी. मेडिसिन, PGDEMS, CCMG, CCCN) उपस्थित होते. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष मा. श्री. नसिर अहमद खलिफा, खजिनदार मा. श्री. मुश्ताक अहमद चौधरी आणि संचालक सदस्य मा. श्री. अल्ताफ कय्युम बुऱ्हाण यांचीही प्रमुख उपस्थिती लाभली.

सकाळी ११.१५ वाजता मान्यवरांच्या हस्ते रोपट्याला पाणी घालून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. या सोहळ्यास विद्यार्थी, पालक, प्राध्यापक, माजी विद्यार्थी तसेच परिसरातील नागरिकांची उत्स्फूर्त उपस्थिती लाभली. महाविद्यालयाच्या वतीने सर्व मान्यवरांचा शाल, पुष्पगुच्छ आणि सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.संस्थेचे प्राचार्य मा.डॉ.सर्फराज शेख सर यांनी प्रास्ताविकात उपस्थित मान्यवर, पालक आणि नवोदित विद्यार्थ्यांचे स्वागत करत महाविद्यालयाने अभियांत्रिकी शिक्षण क्षेत्रात केलेली प्रगती, आधुनिक प्रयोगशाळा, डिजिटल शिक्षण व्यवस्था, अद्ययावत ग्रंथालय आणि विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असलेल्या विविध सुविधा यांची माहिती दिली.

प्रशासनाने अंमलात आणलेल्या काही नव्या नियमांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी विद्यार्थी व पालकांनी सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले.

उन्हाळी परीक्षा २०२६ मधील उत्कृष्ट निकालाबद्दल विद्यार्थी आणि प्राध्यापकांचे अभिनंदन करत त्यांनी डिप्लोमा शिक्षण हे केवळ पदवीचे माध्यम नसून प्रत्यक्ष कौशल्यांचा मजबूत पाया असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांनी पहिल्या दिवसापासून नियमित अभ्यास, शिस्त आणि कौशल्य विकासावर भर द्यावा, असा संदेश त्यांनी दिला. ग्रामीण आणि शहरी भागातील प्रत्येक विद्यार्थ्याला परवडणाऱ्या शुल्कात गुणवत्तापूर्ण तांत्रिक शिक्षण उपलब्ध करून देणे हे संस्थेचे प्रमुख ध्येय असल्याचे त्यांनी नमूद केले.

पालकांनी संस्थेवर दाखविलेला विश्वास संस्था कायम सार्थ ठरवेल आणि विद्यार्थ्यांना कुशल अभियंते तसेच जबाबदार नागरिक घडविण्यासाठी कटिबद्ध राहील, अशी ग्वाही त्यांनी दिली.

प्रमुख पाहुणे मा. वसीम खाजाभाई बुऱ्हाण यांनी अल्पसंख्याक विकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध शिष्यवृत्ती योजना, शैक्षणिक अनुदान आणि वसतिगृह सुविधांची माहिती विद्यार्थ्यांना दिली. आजच्या जागतिक स्पर्धेच्या युगात तांत्रिक कौशल्यांसोबतच संवाद कौशल्य विकसित करणे अत्यावश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. शिक्षणाचा उपयोग केवळ वैयक्तिक प्रगतीसाठी न करता समाजातील वंचित घटकांच्या उन्नतीसाठी आणि राष्ट्राच्या विकासासाठी करावा, असे आवाहन त्यांनी केले.

केवळ गुण मिळविण्यापेक्षा विषयाचे संकल्पनात्मक ज्ञान आत्मसात करण्यावर भर देण्याचा सल्ला देत त्यांनी प्रात्यक्षिक ज्ञान, शिस्त, सुरक्षिततेचे नियम आणि व्यावसायिक नैतिकतेचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून दिले.

मा. डॉ. इस्माईल शेख यांनी खऱ्या माहितीचा स्रोत या विषयावर प्रभावी मार्गदर्शन केले. माहितीच्या युगात सोशल मीडियावरील प्रत्येक माहिती सत्य असेलच असे नाही. त्यामुळे कोणत्याही माहितीवर विश्वास ठेवण्यापूर्वी तिची पडताळणी करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

पुस्तके, शिक्षक, पालक, अधिकृत सरकारी संकेतस्थळे, नामांकित वृत्तसंस्था आणि संशोधन संस्थांची माहिती अधिक विश्वासार्ह असल्याचे नमूद करत विद्यार्थ्यांनी विचारपूर्वक माहिती स्वीकारण्याची सवय लावावी, असे त्यांनी आवाहन केले. ज्ञान म्हणजे केवळ माहिती नव्हे, तर सत्य ओळखण्याची क्षमता आहे, हा त्यांचा संदेश उपस्थितांच्या मनाला स्पर्शून गेला.

गुणगौरव सोहळ्यात सन्मानित विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय महाविद्यालयातील प्राध्यापकांचे मार्गदर्शन, पालकांचा पाठिंबा आणि संस्थेतील उत्कृष्ट शैक्षणिक वातावरणाला दिले. नियमित अभ्यास, वेळेचे योग्य नियोजन आणि सातत्यपूर्ण सराव यामुळेच हे यश मिळाल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. अतिया शेख यांनी, तर आभार प्रदर्शन श्री. अझर गिरगावकर यांनी केले. संपूर्ण कार्यक्रम यशस्वी आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पाडण्यासाठी सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित पालकांनी महाविद्यालयातील शैक्षणिक सुविधा, शिस्तबद्ध वातावरण आणि विद्यार्थीकेंद्रित उपक्रमांचे कौतुक केले. नवोदित विद्यार्थ्यांनीही उत्साहाने महाविद्यालयीन जीवनाची सुरुवात करत उज्ज्वल भविष्यासाठी प्रयत्नशील राहण्याचा निर्धार व्यक्त केला.

---

# शिराढोण पोलिस ठाण्याचे नूतन सहाय्यक पोलीस निरीक्षक घाडगे यांचा पोलिस पाटील संघटनेच्या वतीने सत्कार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधी : कळंब तालुक्यातील शिराढोण पोलिस ठाण्याचे नूतन सहाय्यक पोलीस निरीक्षक म्हणून रुजू झालेले श्री. राम घाडगे यांचा दि.५ ऑगस्ट २०२६ रोजी पोलिस ठाणे शिराढोण येथे पोलिस पाटील संघटनेच्या वतीने संघटनेचे राज्य कार्यकारिणी सदस्य श्री.राजाभाऊ वाघमारे व पदाधिकारी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

गावातील कायदा-सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पोलीस आणि पोलिस पाटील यांनी समन्वयाने काम करावे, असे यावेळी राजाभाऊ वाघमारे यांनी मत व्यक्त केले. नूतन पीआय श्री. घाडगे यांनीही नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी प्राधान्याने लक्ष देण्याचे आश्वासन दिले.श्री. राम घाडगे हे या पुर्वी आनंदनगर, पोलिस ठाणे धाराशिव येथे कार्यरत होते. या सत्कार प्रसंगी राजाभाऊ वाघमारे, विशाल टिंगरे, सिद्धार्थ आल्टे,जमीर शेख, धोंडिराम झांबरे, माधुरी माने,वनमाला अटकुरे, पांडुरंग मस्के, धनराज आव्हाड, मच्छिंद्र चोपडे, आदी उपस्थित होते. नुतन स.पो.नि.राम घाडगे यांना सर्वांनी शुभेच्छा देऊन पुढील कार्यास सहकार्याचे आश्वासन दिले.

---

# ज्येष्ठ पत्रकार संजय निंबाळकर यांचा वाढदिवस उत्साहात साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

(शहर/तालुका प्रतिनिधी):

निर्भीड आणि निष्पक्ष पत्रकारितेच्या माध्यमातून जनसामान्यांचे प्रश्न सातत्याने प्राधान्याने मांडणारे ज्येष्ठ पत्रकार संजय निंबाळकर यांचा वाढदिवस नुकताच अत्यंत उत्साहात आणि आनंदमयी वातावरणात संपन्न झाला. या निमित्ताने राजकीय, सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक अशा विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी त्यांची प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांना वाढदिवसाच्या भरभरून शुभेच्छा दिल्या व त्यांचा यथोचित सत्कार केला.



पत्रकार संजय निंबाळकर यांनी आपल्या धारदार लेखणीतून समाजाला नेहमीच योग्य दिशा दाखवण्याचे काम केले आहे. त्यांच्या या सामाजिक योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी सकाळपासूनच त्यांच्या निवासस्थानी आणि कार्यालयात हितचिंतक, मित्रपरिवार व चाहत्यांची मोठी गर्दी पाहायला मिळाली.

### विविध क्षेत्रांतील मान्यवरांकडून शुभेच्छांचा वर्षाव

सभापती दत्ता भैया मगर यांच्याकडून गौरव

या अभिष्टचिंतन सोहळ्याला पंचायत समितीचे विद्यमान सभापती दत्ता भैया मगरी यांनी आवर्जून उपस्थिती लावली. त्यांनी पत्रकार संजय निंबाळकर यांचा शाल, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन विशेष सत्कार केला.

यावेळी बोलताना सभापती दत्ता भैया मगर म्हणाले, संजय निंबाळकर यांनी आपल्या पत्रकारितेच्या माध्यमातून नेहमीच समाजातील तळागाळातील लोकांचे प्रश्न प्रशासनासमोर मांडले आहेत. लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून त्यांची भूमिका अत्यंत कौतुकास्पद आणि प्रेरणादायी आहे. त्यांना उत्तम आरोग्य, सुख-समृद्धी आणि दीर्घायुष्य लाभो, याच माझ्या त्यांना मनःपूर्वक शुभेच्छा आहेत. या कार्यक्रमादरम्यान इतरही अनेक स्थानिक नेते, प्रशासकीय अधिकारी, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिकांनी निंबाळकर यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव केला. सोशल मीडियाच्या माध्यमातूनही त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत होता. आपल्या सत्कार समारंभाला उत्तर देताना पत्रकार संजय निंबाळकर यांनी उपस्थित सर्व मान्यवर, पंचायत समिती सभापती दत्ता भैया मगर आणि मित्रपरिवाराचे मनःपूर्वक

### पंचायत समिती सभापती दत्ता भैया मगर यांच्या हस्ते विशेष सत्कार

आभार मानले. समाजाप्रती असलेली माझी बांधिलकी मी कधीही विसरणार नाही आणि जनसामान्यांच्या हक्कासाठी माझी लेखणी यापुढेही अशीच अविरत चालत राहील, अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली.

---

# तोरणमाळ जागतिक दर्जाचे पर्यटनस्थळ म्हणून विकसित करू : पर्यटन मंत्री शंभूराज देसाई



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : तोरणमाळचा पर्यटन विकास शाश्वत, नियोजनबद्ध आणि पर्यावरणपूरक पद्धतीने करताना तेथील नैसर्गिक वारसा जपत पर्यटकांसाठी आधुनिक व दर्जेदार सुविधा निर्माण करण्यावर राज्य शासनाचा भर राहील, असे प्रतिपादन पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांनी केले.

तोरणमाळ पर्यटन विकास आराखड्याबाबत केंद्र शासनाकडे सादर करण्यात येणाऱ्या प्रस्तावाच्या अनुषंगाने आढावा बैठक पर्यटन मंत्री देसाई यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृह येथे झाली. या बैठकीस आमदार आमश्या पाडवी, आमदार चंद्रकांत रघुवंशी, पर्यटन विभागाचे अपर मुख्य सचिव संजय खंदारे (भा.प्र.से.), महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक नीलेश गटणे, पर्यटन संचालनालयाचे संचालक विकास पानसरे, पर्यटन विभागाचे उपसचिव संतोष रोकडे, सहसंचालक संतोष जाधव, सहायक संचालक रवींद्र पवार, कार्यकारी अभियंता आकाश चकोर तसेच दूरदृश्य प्रणालीद्वारे नंदुरबार जिल्हाधिकारी, नाशिक पर्यटन विभागाचे उपसंचालक आणि इतर संबंधित अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत तोरणमाळ पर्यटन विकास आराखड्याच्या विविध बाबींचा सविस्तर आढावा घेण्यात आला. तोरणमाळचा पर्यटन विकास नियोजनबद्ध, शाश्वत आणि दर्जेदार पद्धतीने व्हावा, यासाठी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या मालकीच्या ११ हेक्टर ५६ आर जागेची तातडीने मोजणी करून तिची चतुःसीमा निश्चित करण्याच्या सूचना नंदुरबार जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आल्या. तसेच महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या नाशिक विभागातील अधिकाऱ्यांनी आवश्यक पाठपुरावा करून संबंधित जागेचे नकाशे व चतुःसीमा एका महिन्याच्या आत निश्चित करावेत, असे निर्देशही पर्यटन मंत्री देसाई यांनी दिले.

तोरणमाळचा नैसर्गिक, जैववैविध्यपूर्ण आणि पर्यटनदृष्ट्या वैशिष्ट्यपूर्ण वारसा जपत आधुनिक सुविधा, पर्यावरणपूरक विकास, पर्यटन पायाभूत सुविधा आणि पर्यटकांना आकर्षित करणाऱ्या विविध घटकांचा समावेश पर्यटन विकास आराखड्यात करण्यात यावा, अशा सूचनाही यावेळी देण्यात आल्या. केंद्र शासनाकडे सादर करण्यात येणारा प्रस्ताव सर्वंकष, परिणामकारक आणि भविष्यातील पर्यटन विकासाच्या दृष्टीने सक्षम असावा, यावरही बैठकीत भर देण्यात आला.

---

**विधीज्ञांनी नोंदविला सहभाग**

# जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या वतीने ४९ ज्येष्ठ विधिज्ञांचे ४० तासांचे मध्यस्थी प्रशिक्षण यशस्वी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/जिमाका : मुख्य मध्यस्थी देखरेख समिती, मुंबई उच्च न्यायालय यांच्या निर्देशानुसार जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूर यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेला ४० तासांचा मध्यस्थी प्रशिक्षण कार्यक्रम नियोजन भवन, सोलापूर येथे समारोप समारंभपूर्वक संपन्न झाला. या प्रशिक्षणामध्ये सोलापूर, अक्कलकोट आणि मोहोळ येथील ४९ ज्येष्ठ विधिज्ञांनी यशस्वीरीत्या सहभाग नोंदविला.



समारोप समारंभाच्या अध्यक्षस्थानी एम.सी.पी.सी., नवी दिल्लीचे वरिष्ठ प्रशिक्षक संजीव भालेराव होते. तर कार्यक्रमाचे आयोजक व संभाव्य प्रशिक्षक न्यायाधीश अमोलकुमार ए. देशपांडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी मार्गदर्शन करताना संजीव भालेराव यांनी सांगितले की, मध्यस्थीच्या माध्यमातून प्रलंबित वाद सामोपचाराने निकाली काढण्यास मोठी चालना मिळेल. प्रशिक्षित मध्यस्थ न्यायव्यवस्थेवरील ताण कमी करण्यास आणि वाद तडजोडीने मिटविण्यास महत्त्वाची भूमिका बजावतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

श्री. अमोलकुमार ए. देशपांडे यांनी प्रशिक्षणाचा आढावा घेत सहभागींना मार्गदर्शन केले. तसेच प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष मनोज एस. शर्मा यांनी प्रशिक्षणार्थींना दिलेल्या शुभेच्छाही त्यांनी यावेळी व्यक्त केल्या.

प्रशिक्षणार्थींनी आपल्या मनोगतात ४० तासांच्या प्रशिक्षणामुळे व्यक्तिमत्त्व विकासासह व्यावसायिक कौशल्यांमध्ये भर पडल्याचे सांगितले. वकिली व्यवसायासोबत प्रशिक्षित मध्यस्थ म्हणून वाद सामंजस्याने सोडविण्यास तसेच प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यासाठी हे प्रशिक्षण अत्यंत उपयुक्त ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

समारोप समारंभात प्रशिक्षण पूर्ण केलेल्या सर्व ४९ विधिज्ञांना मान्यवरांच्या हस्ते प्रशिक्षण पूर्णत्वाची प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. तसेच सोलापूर, अक्कलकोट व मोहोळ बार असोसिएशनच्या प्रतिनिधींनी उत्कृष्ट प्रशिक्षण दिल्याबद्दल वरिष्ठ प्रशिक्षक संजीव टी. भालेराव आणि अमोलकुमार ए. देशपांडे यांचा शाल व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार केला.

या ४० तासांच्या मध्यस्थी प्रशिक्षण कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष मनोज एस. शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच सचिव अमोलकुमार ए. देशपांडे यांच्या देखरेखीखाली जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूरच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. असे जिल्हा विधी सेवा प्राधिकरण अधिक्षक एस.ए.जी.नदाफ यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये कळविले आहे.